। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २२८ वा । शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे :आरोपी नामे-सलीम युनुस शेख, वय ४० वर्षे, रा. मिल्ली कॉलनी धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.१९.११.२०२५ रोजी ११.३० वा. सु.कोहीनुर हॉटेलकडे जाणारे रोडवर महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ सुहाना केसर गुटखा,प्रिमियम झेड एन -१,जाफरानी जर्दा, बाजीराव फलेवरेड पान मसाला पाउच, रॉयल २२० तंबाखु, मस्तानी प्रिमियम चेविंग टोबॅको असा एकुण ६,२५५ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला आनंदनगर पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- २२३, २७४, २७५ अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### निष्काळजीपने अग्नी प्रज्वलीत करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

परंडा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत सार्वजनिक रस्त्याकडेला हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत कणाऱ्यांवर परंडा पोलीसांनी दि. १९ नोव्हेंबर रोजी ४ कारवाया केल्या. यात ईडा ता. भुम येथील ग्रामस्थ- विनायक वय ४५ वर्षे, साहील वय २० वर्षे, दत्तात्रय वय ४४ वर्षे, अमोल वय ३० वर्षे, यांनी ईडा साखर कारखान्या जवळ रोडचे डावे बाजूस रस्त्याकडेला आपापल्या हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत करुन पदार्थ तयार करत असताना परंडा पोलीसांना मिळून आले.यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरध्द भा.न्या.सं. कलम- २८७ अन्वये परंडा पो.ठा. येथे स्वतंत्र ४ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

### चाकूचा धाक दाखऊन लुटले, गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी राधेश्याम फुलेंद्र सरोज, वय ४५ वर्षे, रा. २३३ चिरकोट ता. लालगंज जि. आगड, राज्य उत्तरप्रदेश ह.मु. यादव नगर भोईसर पालघर व सोबत त्यांचे मिश्र बहादुर व अखिलेख हे दि.१२.११.२०२५ रोजी बाळासाहेब, शोभा , काजल व चिवाबाई सर्व रा. भुम यांचे घरी सोने खरेदी करीता गेले असता नमुद तिघांनी पैसे घेवून आलात का असे विचारले असता फिर्यादीने सांगितले की, आम्ही सध्या पैसे आणले नाही असे सागिंतले असता नमुदांनी चाकुचा धाक दाखवून फिर्यादी व त्यांचे मित्र यांचे खिशातील दोन मोबाईल फोन रोख रक्कम १५०० जबरीने चोरुन घेतले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राधेश्याम सरोज यांनी दि.१९.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०९(६) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## लोहपुरुषांना अभिवादन करत धाराशिवमध्ये 'युनिटी मार्च' उत्साहात: पदयात्रेला धाराशिवकरांचा उत्स्फूर्त सहभाग




धाराशिव (जिमाका) -लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त धाराशिव जिल्हा प्रशासन,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युनिटी मार्च (एकता रॅली) पदयात्रा आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी श्री किर्ती किरण पुजार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेची सुरुवात केली.यावेळी राष्ट्रीय एकात्मता वृद्धीसाठी उपस्थित सर्वांनी 'आत्मनिर्भर भारत संकल्प' ही शपथ घेतली.

या कार्यक्रमात श्रीकांत हरनाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी,श्री.राहुल डोंगरे,जिल्हा युवा अधिकारी, श्री दत्तप्रसाद जंगम, उपशिक्षणाधिकारी भारत देवगुडे, विस्तार अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्रीमती तेलोरे यांनी केले.

पदयात्रा श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमपासून सुरू होऊन नगरपरिषदमार्गे,पोलीस अधीक्षक कार्यालय रस्ता, कोहिनूर हॉटेल, दूरदर्शन केंद्र,समता कॉलनी मार्गे जिल्हा क्रीडा संकुल येथे सांगता झाली.

क्रीडा विभाग आयोजित या पदयात्रेत छत्रपती शिवाजी हायस्कूल,व्यंकटेश महाजन महाविद्यालय,भाई उद्धवराव पाटील विद्यालय,शासकीय नर्सिंग महाविद्यालय,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,आर्य चाणक्य विद्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांसह सुमारे ७०० विद्यार्थी व अधिकारी-कर्मचारी सहभागी होते.

पदयात्रा यशस्वी करण्यासाठी तालुका क्रीडा अधिकारी श्री.भैरवनाथ नाईकवाडी, क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, नेहरू युवा केंद्राचे वैभव लांडगे, किशोर भोकरे, सुरेश कळमकर, व्यंकटेश दंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## टिबी शोध मोहिमेला वेग ; १.१५ लाखांची निक्षयवर नोंदणी पूर्ण

धाराशिव (जिमाका) -जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा टिबी फोरम समिती व जिल्हा टिबी को-मोर्बिडिटी समन्वय समितीची सभा २० नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात संपन्न झाली.यावेळी डॉ.मैनाक घोष, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प,डॉ. सतीश हरीदास,जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.धनंजय चाकुरकर,जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ.मारुती कोरे, सहाय्यक संचालक(कुष्ठरोग) डॉ.अभिजित बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी,डॉ.के.के.मिटकरी,जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.सुशील चव्हाण,जिल्हा हिवताप अधिकारी,डॉ.रमजान अली शेख, वैद्यकीय अधिकारी, श्री.आर.बी. जोशी,प्रशासकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय सास्तूर तसेच सर्व वैद्यकीय अधीक्षक,उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांचे अधिकारी, सर्व तालुका आरोग्य अधिकारी आणि समिती सदस्य उपस्थित होते.सभेमध्ये जिल्ह्यातील आरोग्य संस्थांनिहाय 'टिबी मुक्त भारत' अभियानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यातील २ लक्ष ८३ हजार १७४ जोखीमग्रस्त लोकसंख्येची निक्षय पोर्टलवर नोंदणी करावयाची असून, १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत १ लक्ष १५ हार ४४४ नोंदण्या पूर्ण झाल्या आहे. त्याचप्रमाणे ४४ हजार ६१३ एक्स-रे झालेल्या व्यक्तींची माहितीही पोर्टलवर अद्ययावत करण्यात आली आहे.

तसेच उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांच्या बाह्यरुग्ण विभागांमार्फत संशयित क्षयरुग्ण शोधण्याचे कार्य उद्दिष्टानुसार आणखी गतीमान करण्याचे निर्देश देण्यात आले. क्षयरोग निर्मूलनाच्या दिशेने समाजाचीही साथ आवश्यक असल्याचे अधोरेखित करत जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांच्या हस्ते दोन क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले.

या निमित्ताने आरोग्य विभागाने दानशूर नागरिकांना क्षयरुग्ण दत्तक घेऊन त्यांना पोषण आहार किट उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले.क्षयरोगावरील उपचारादरम्यान रुग्णाला पोषण हे महत्त्वाचे शस्त्र असून,समाजाच्या सहभागातून हा लढा अधिक प्रभावी होऊ शकतो, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

टिबी फोरम समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व उपस्थित सदस्यांचे आभार डॉ.अभिजित बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी तथा सदस्य सचिव, टिबी फोरम समिती यांनी मानले.

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या पहिल्या शहर व ग्रामीण शाखेचा उद्घाटन सोहळा संपन्न



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या जिल्ह्यातील सर्व नूतन कार्यकारणीची नियुक्ती नुकतीच करण्यात आलेली आहे.याच अनुषंगाने धाराशिव शहरात व धाराशिव तालुक्यात समितीच्या शाखा निर्माण करण्यासाठी जनसामांन्यातून मागणी येत होती. त्यानुसार धाराशिव शहरातील पहिली शाखा धारासुर मर्दिनी देवी मंदिर या भागात पहिल्या शाखेचे उद्घाटन समितीचे नूतन अध्यक्ष श्री अमोल सिरसट व शहराध्यक्ष श्री संतोष घोरपडे यांच्या हस्ते करण्यात आले.नूतन शाखेच्या शाखाध्यक्षपदी श्री पवन राऊत तर उपाध्यक्षपदी श्री मनोज घवांडे व श्री उत्तम जाधव तर सचिव श्री दीपक कदम कार्याध्यक्ष श्री गणेश सुरवसे कोषाध्यक्ष श्री आनंद देवकर प्रसिद्धीप्रमुख श्री एजाज शेख यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. धारासुर मर्दिनी देवीला पुष्पांजली वाहून फटाक्यांच्या आतषबाजीत व घोषणांनी समितीच्या शाखा फलकाचे उद्घाटन करण्यात आले.ग्रामीण भागातील समितीची पहिली शाखा मौजे राघूचीवाडी येथे समितीचे अध्यक्ष श्री अमोल सिरसट व तालुकाध्यक्ष श्री बबलू भोईटे व विभागप्रमुख श्री सुनीलराव मिसाळ यांचे हस्ते करण्यात आले. या शाखेचे शाखाध्यक्ष म्हणून श्री संकेत नलावडे यांची तर उपाध्यक्ष श्री बबलू यमगर व श्री जितेंद्र नलावडे तर सचिव श्री बालाजी चौरे कार्याध्यक्ष श्री खंडू गायकवाड कोषाध्यक्ष श्री तात्यासाहेब करवर प्रसिद्धी प्रमुख श्री शंकर मोरे यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. हलग्यांच्या निनादात व प्रचंड घोषणाबाजी देत शेकडो गावकऱ्यांच्या उपस्थितीत समितीच्या शाखा फलकाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी समितीचे अध्यक्ष श्री अमोल सिरसट उपाध्यक्ष श्री हनुमंत यादव सचिव श्री आकाश भोसले कार्याध्यक्ष श्री मनोज मोरे तालुकाध्यक्ष श्री बबलू भोईटे शहराध्यक्ष श्री संतोष घोरपडे शहर उपाध्यक्ष श्री भैरवनाथ रणखांब रिक्षा समिती अध्यक्ष श्री तुशाल सूर्यवंशी श्री धर्मराज सूर्यवंशी श्री हनुमंत तांबे सर कुणाल जानराव अमीन दस्तगीर हमीद पटेल मयूर वाळवे दीपक कदम संदीप नलावडे श्रीराम पंडित कान्हा माळी शंकर विधाते अनिल कदम पिंटू सरडे गोकुळ पवार अमर मस्के गोविंद यादव गणेश कदम बाबा शेख नामदेव भुसनर अक्षय नलावडे बालाजी गायकवाड महमूद शेख दिलदार पठाण यासह शेकडो समितीचे मावळे पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बस चालक -मालकांसाठी २३ नोव्हेंबर रोजी मार्गदर्शन कार्यशाळा

धाराशिव (जिमाका)- नंदुरबार जिल्ह्यातील अमलीबार येथे शालेय विद्यार्थ्यांच्या बसला झालेल्या भीषण अपघातात विद्यार्थ्यांचे निधन व अनेक विद्यार्थी जखमी झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शालेय विद्यार्थी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे आणि भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती टळावी,यासाठी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सर्व स्कूलबस चालक व मालकांसाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा रविवार,दि.२३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता,उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,एमआयडीसी, प्लॉट नं. पी-१८, धाराशिव येथे होणार आहे.

तरी सर्व स्कूलबस चालक-मालकांनी या कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

**स्कूलबससाठी अनिवार्य पालन करावयाच्या उपाययोजना**

वेग नियंत्रण यंत्रणा सुस्थितीत आहे का याची तपासणी,अग्नीशमन सिलेंडरची मुदत तपासणे व आवश्यक असल्यास रिफिलिंग करणे,प्रथमोपचार पेटीतील साहित्य पूर्ण आहे याची खात्री,वाहनाची वैध कागदपत्रे - इन्शुरन्स,योग्यता प्रमाणपत्र,पीयूसी,टॅक्स,परवाना तपासणी,चालकाकडे वैध अनुज्ञप्ती व बॅजची खात्री केली असावी. विद्यार्थी सुरक्षेसाठी २१ नोव्हेंबरपासून स्कूलबस तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून कागदपत्रांची पूर्तता नसल्यास वाहन विद्यार्थी वाहतूक करू नये. नियमभंग आढळल्यास महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८८ अंतर्गत कारवाई केली जाईल,असे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,धाराशिव यांनी कळविले आहे.

## पर्यटन विकास समिती व पुरातत्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वारसा सप्ताहानिमित्त तेर येथे हेरिटेज वॉक संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)- तेर दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने जागतिक वारसा सप्ताह निमित्त सहाय्यक संचालक (पुरातत्व), छत्रपती संभाजीनगर विभाग व पर्यटन जनजागृती संस्था धाराशिव, संचलित पर्यटन विकास समिती धाराशिव आणि पुरातत्व विभाग,कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय पुराणवस्तू संग्रहालय महाराष्ट्र संत विद्यालय आणि तेरणा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तेर येथे हेरिटेज वॉकचे आयोजन संपन्न झाले,तेर हे प्राचीन शहर असुन तेरला ऐतिहासिक असा पुरातत्व पर्यटनाचा वारसा लाभला असुन याची जनजागृती व्हावी यासाठी शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली जनजागृती रॅली काढण्यात आली,रॅलीत आमचे शहर प्राचीन तगर असा जयघोष करीत प्राचीन तेर याला दुजोरा देण्यात आला.त्रिविक्रम मंदिर,उतरेश्वर मंदिर सह इतर प्राचीन स्थळे व कै.लामतुरे प्राचीन वास्तु संग्रहालयाल येथे रॅलीचा समारोप करण्यात आला, पर्यटन विकास समितीचे अध्यक्ष युवराज नळे यांनी मार्गदर्शन केले तर नरहरी बडवे यांनी सुत्रसंचलन केले,आलेल्या मान्यवरांचे प्राचीन स्थळांविषयीचे पुस्तक व गुलाब पुष्प देऊन वास्तु संग्रहालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला,यावेळी पर्यटन विकास समितीचे अध्यक्ष युवराज नळे, मार्गदर्शक डॉ अभय शहापूरकर, मार्गदर्शक प्रा.अभिमान हंगरगेकर,उपाध्यक्ष गणेश वाघमारे,कोषाध्यक्ष बाबासाहेब गुळीग, सदस्य राजाभाऊ कारंडे,पुरातत्त्वज्ञ रविंद्र शिंदे,सदस्य विजय गायकवाड,वैभव वाघचौरे,नरहरी बडवे सह पुरातत्व विभाग, पर्यटन विकास समितीचे पदाधिकारी आणि शालेय विद्यार्थी,शिक्षक उपस्थित होते.

## उसाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीखाली चिरडून एका महिलेचा जागीच मृत्यू



परंडा (प्रतिनिधी)- गुरुवारी (दि.२०) सकाळी हा अपघात झाला. सविता शंकर मुसळे (५३, रा. नाईकवाडी प्लॉट, बार्शी) या सोनारी येथे भैरवनाथाचे दर्शन करून परत परंड्यात येत असताना पवार कॉम्प्लेक्ससमोर उसाचा ट्रॅक्टर अचानक त्यांच्या दिशेने येताच त्या ट्रॉलीच्या चाकाखाली आल्या.

यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरून पसार झाला असून, या प्रकरणी गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. दरम्यान, परंडा बार्शी रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असल्याने सध्या रस्त्यावर वाहतुकीची प्रचंड गर्दी आणि अव्यवस्था निर्माण झाली आहे.

चुकीच्या दिशेने होणारी वाहतूक, खोल खड्डे, तसेच बेकायदेशीर वाहनचालकांमुळे अपघातांची संख्या वाढत असल्याची चर्चा नागरिकांत सुरू आहे.

या अपघातानंतर ठेकेदार व संबंधित बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवून तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वातावरण शुद्धीची गरज

भारतात विविध कारणाने वातावरण दुषीत होते. त्यापासून विविध रोग उत्पन्न होतात. याची माहिति असताना काळजी घेतली जात नाही. उलट प्रदुर्शन वाढणाऱ्याबाबीत वाढ होत आहे. जनतेत अजून जागृती दिसून येत नाही. पुर्वी पेक्षा दुर्धर रोगात वाढ होत आहे. काही झाले तरी या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. प्रदुर्शनात का वाढ आहे किंवा यामागील कारणाचा शोध घेतला पाहिजे. जो पर्यंत शोध घेतला जात नाही तो पर्यंत चिंतेची बाब आहे. त्यामुळे आगामी संकटावर मात करण्यासाठी काही विचापुर्वक वागले पाहीजे. वातावरणात सर्वात दुषीत हवा ही चार व दोन चाकी गाड्याने होत आहे. एकतर त्याचे आयुष्य संपले तरी काही गाड्या वापरल्या जातात. त्याच प्रमाणे इलेक्ट्रिक गाड्या बाजारात मोठ्या प्रमाणात आल्या आहेत. त्या खिशाला परवडणाऱ्या नाहीत. वास्तविक इतर देशाबरोबर तुलनात्मक विचार केला जातो. त्या देशातील जनतेची मानसिकता कशी आहे याचा विचार केला जात नाही. इतर देशात टाकाऊ पदार्थपासून टिकावु वस्तू बनवितात तसे भारतात नाही. ई-कचऱ्याचा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्याच प्रमाणे रस्ते खराब आहेत. एकीकडे रोड-टॅक्स घेतला जातो. त्या प्रमाणात सुविधा दिल्या जात नाहीत. हे योग्य नाही. काही रस्ते सोडले तर अनेक रस्त्याची खराब आवस्था शोकनिय आहे. मुळात टिकाऊ रस्ते होत नाहीत. अतिषय तकलादू रस्त्याची निर्मिती होते. याकडे कोणाचेही लक्ष नाही. मुळात विकासाची कामे जनतेच्या पैशातून होतात. जनतेचा पैसा वाटोळा होतो. ही वस्तूस्थिती असताना आपल्याला काय करायाचे असे अज्ञानाने बोलले जाते. ही वेगळी बाब आहे. त्याच प्रमाणे सध्याला इलेक्ट्रिक गाड्या बाजारात आल्या असल्यातरी पेट्रोल व डिझेलच्या गाड्या खरेदीकडे ओढ आहे. त्या बंद होतील का नाही यात न जाता ज्या गाड्यातून दूषीत वायू निघतो त्यावर तरी बंदी असली पाहिजे. निर्बंध असले पाहिजेत. कारण मोठ्या प्रमाणात ॲटोतून भेसळ इंधनाचा वापराने धुर निघतो, तो हानीकारक आहे. हे सर्वांना कळते. याला विरोध कोणी करीत नाही. आता पेट्रोल किंवा डिझेलच्या गाड्या वापरण्याचे प्रमाण कमी झाले तरी पेट्रोल-डिझेलच्या गाड्याकडे वळण्याकडे कल अधिक आहे. त्याच प्रमाणे अनेकांना गाड्यामध्ये ज्या बॅटऱ्या वापरल्या जातात या बाबत शंका आहे. आलिकडे मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक गाड्याचा वापरण्याचा कला वाढला आहे. सरकारने आता हेवीलोडच्या ई-गाड्या तयार केल्या आहेत. ट्रक तयार केले जात आहेत. रस्त्यावर ईलेक्ट्रिक गाड्या चालविताला टोलफ्रि करण्यात आले आहे असे असले तरी इलेक्ट्रिक गाड्या वापराचे प्रमाण कमी आहे. यावर विचार केला पाहिजे. राज्यकर्त्यांनी विचार करावा की, पेट्राले व डिझलेच्या गाड्याचा वापर कमी प्रमाणात कशाप्रकारे होईल. त्यामुळे वातावरणातील दुषीतपना कशा प्रकारे कमी करता येईल याचा सतत विचार केला पाहिजे. देशात असंख्य गाड्या ज्यांचे आयुष्य संपले तरी चालविल्या जात आहेत. दुसरी गाडी घेणे परवडत नाही. वास्तविक ईलेक्ट्रिकगाड्या ह्या स्वस्तात मिळाल्या पाहिजेत. तशी व्यवस्था केली पाहिजे. कमी रकमेत जर गाड्या मिळाल्या तर पेट्रोल-डिझेलच्या गाड्या कोणी खरेदी करणार नाही. जनतेला चांगला पर्याय मिळाला पाहिजे. पर्याय उपलब्ध नसताना केवळ दबावतंत्र वापरणे योग्य ठरणारे नाही. जनतेनी आता प्रदुर्शनात वाढ होणाऱ्या गाड्या वापरायाच्या नाहीत असा विचार केला पाहिजे. प्रदुर्शन विरहीत गाड्याचा वापर करणार अशी मानसिकता तयार झाली पाहिजे. त्याच प्रमाणे मोठ्या प्रमाणात चार्जिंगची सुविधा निर्माण केली पाहिजे. अजून चार्जिंगचे स्टेशनाचा पत्ताच नाही. चार्जिंग स्टेशन जर पेट्रोलपंपासारखे निर्माण केले तरच जनता बिनधास्त फिरेल. सध्याला एक तर खिशाला परवडणारे इलेक्ट्रिक गाड्याचे दर नाहीत. स्वस्तात कंपन्या गाड्या देऊ शकतात. कंपनीला काही सवलती दिल्या पाहिजेत. त्या देणे अपेक्षित आहे. गाड्याचे दर हे सरकारने काही प्रमाणात निश्चित केले पाहीजेत. इलेक्ट्रिक गाड्याचे उत्पादनखर्च निश्चित केला पाहिजे. परदेशात इलेक्ट्रिक गाड्याचा वापर वाढल्याने प्रदुर्शनात वाढ झाली नाही. त्यामुळे आरोग्यात बिघाड होत नाही. आरोग्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे. त्याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. मुळात अनेक वेळा साध्यबाबीकडे दुर्लक्ष केल्याने हृद्यासारखे रोग होतात. हवा दुषीत झाली की आरोग्य बिघडलेच समजा. त्यामुळे सर्वात महत्वाचे आरोग्याची काळजी घेणे हा आहे. वातावरण दुषीत का होते तर खराब पेट्रोल व डिझेलच्या गाड्या, कचरा जाळणे, टायर जाळणे, लाकडाचा धुर, प्लास्टीक जाळणे, ॲटोतून भेसळ इंधनाचा वापर होत असल्याने त्यातून निघणारा धुर अतिषय हानीकारक असतो. ह्या बाबीचा विचार केला पाहिजे. त्यामुळे अतिषय कमी किंमतीत ई-गाड्या सहज उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. महागाड्या कोणी खरेदी करणार नाही. त्याच प्रमाणे उत्पादन खर्चावर आधारीत किंमत असल्या पाहिजेत. तरच इलेक्ट्रिक गाड्या खरेदी करतील. मोठ्या प्रमाणात हवेत वातावरण दुषीत होणारे पदार्थ मिसळत आहे. याचा परिणाम आरोग्यावर होत आहे. चांगल्याबाबी स्विकारल्या पाहिजेत. त्याशिवाय जनतेची प्रगती होणार नाही. जनतेला काही बाबी स्वस्तात मिळाल्या पाहिजेत. त्याच प्रमाणे खिशाला परवडणाऱ्यादेखील मिळाल्या पाहिजेत. वातावरण बदलाचा परिणात हा ऋतूत बदलामुळे दिसून येत आहे. भर उन्हाळ्यात पाऊस पडत आहे. आवाजी थंडी सहन करावी लागत आहे. ऋतूत बदलाचा परिणाम केवळ मानवावरच होत नाही तर निसर्गावर देखिल होत आहे. वन्यप्राणी गाव वस्तीत शिरून हल्ला करीत आहेत. दुषीत वातावरण मोठ्या प्रमाणात परिणाम होत असताना त्यापासून कशा प्रकारे बचाव कराता येईल. शुद्ध वातावरणात जीवन कसे जगता येईल याचा विचार सतत केला पाहिजे. त्यामुळे सुधारणेसाठी पहिल्यांदा गाड्यापासून होणारे प्रदुषण रोखण्याचा संकल्प केला पाहिजे. सर्वाधिक गाड्या ह्या आपल्यादेशात वापरल्या जातात ही बाब नजरेआड करून चालणार नाही.

# श्री गुरु तेग बहादुर - ‘हिंद दी चादर

**श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ - नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना ‘हिंद दी चादर’ या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ - नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना ‘हिंद दी चादर’ या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.**

एप्रिल १६२१ मध्ये अमृतसरमध्ये श्री गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरू हरगोबिंद आणि माता गुजरी यांच्या कुटुंबात झाला. १६६४ मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरु पदवी प्राप्त झाली होती. गुरू तेग बहादूर यांचे मूळ नाव त्यागमल होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना तेग बहादूर म्हणजेच तलवारीसारखा धैर्यवान हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा देत असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत, ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले.

मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरूतेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२ मध्ये त्यांची ४०० वी जयंती देशभर साजरी केली होती.

त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

**‘जो नर दुःख में दुःख नहीं मानै,**
**सुख सनेहु अरू भय नहीं जा कै,**
**कांचन माटी मानै,**
**लोभ मोह अभिमान न ता कै, हरख सोग नहीं जा कै**
**जो नर दुःख में दुःख नहीं मानै’**

म्हणजेच जो मनुष्य दुःखात असला तरी दुःखी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत.

त्यांच्या शहीद समागमास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अल्पसंख्यांक विभाग आणि श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नुकत्याच या कार्यक्रमांच्या आयोजनानिमित्त कार्यशाळा घेण्यात आली होती. यावेळी ‘हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब’ यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेनिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले होते आणि हा कार्यक्रम जनमानसांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करीत आहे. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी आहे. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

# बॅंकिंग क्षेत्रात अधिक पारदर्शकतेसाठी डी-डुप्लिकेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे-जिल्हाधिकारी आंचल गोयल

भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या वतीने राबविण्यात येत असलेला ‘तुमचे पैसे, तुमचा हक्क’ हा उपक्रम निष्क्रिय खात्यांमधील रक्कम संबधित खातेदारास, त्यांच्या वारसांना विनासायास परत मिळण्यासाठी उपयुक्त असून सर्वच बॅंकांनी या उपक्रमाची अधिकाधिक जनजागृती करावी. तसेच बॅंकिंग क्षेत्रात पारदर्शकता वाढविण्यास आणि ग्राहक सेवेत सुधारणा घडवून आणण्यास सर्व बॅंकांच्या माहिती तंत्रज्ञान विभागांनी भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर डी-डुप्लिकेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी केले.

बॅंक ऑफ बडोदा या जिल्हा अग्रणी बॅंकेमार्फत मुंबई शहर जिल्ह्यामध्ये हक्क न सांगितलेल्या मालमत्तेचा निपटारा याविषयी यशवंतराव चव्हाण सेंटर सभागृहात आयोजित शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक पुनित पांचोली, बॅंक ऑफ बडोदाचे महाप्रबंधक सुनील शर्मा, कॅनरा बॅंकेचे मुख्य महाप्रबंधक रणजीव कुमार, बॅंक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक सुनील शर्मा, युनियन बॅंकेचे महाप्रबंधक शलजकुमार सिन्हा, पंजाब नॅशनल बॅंकेच्या महाप्रबंधक श्रीमती भुवनेश्वरी, युको बॅंकेचे महाप्रबंधक संदीप कुमार यांच्यासह विविध बॅंकांचे प्रतिनिधी, खातेदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आंचल गोयल म्हणाल्या, डी-डुप्लिकेशन तंत्रज्ञानामुळे खातेदारांचे स्पेलिंग बदललेले नाव, आडनावातील बदल किंवा वेगळे फोटो असले तरी समान खातेधारक ओळखणे सोपे होईल. या तंत्रज्ञानामुळे अनक्लेम्ड रक्कम योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यास मदत होईल. बॅंक खातेदारांनीही ई-केवायसी, वारस नोंद आणि पत्त्यामधील बदल बॅंकेस वेळेत कळविणे आवश्यक आहे. या महत्त्वाच्या कागदपत्रामुळे खात्यातील रकमेची माहिती कुटुंबीयांना सहज मिळू शकेल व खाती निष्क्रीय राहणार नाहीत. तसेच त्या खात्यांमधील रक्कम, खातेदारास, वारसांना तातडीने परत मिळेल, असा विश्वासही जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्यात विविध बॅंकांमध्ये असलेल्या निष्क्रिय खात्यांमध्ये असलेल्या सुमारे सहा हजार कोटी रुपयांपैकी दोन ते अडीच हजार कोटी रुपये फक्त मुंबईमधील असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती गोयल यांनी यावेळी सांगितले. सर्वाधिक लोकसंख्या घनता असलेल्या मुंबईत कामासाठी येणाऱ्या आणि नंतर गावाकडे परतलेल्या नागरिकांमुळे मोठ्या प्रमाणात निष्क्रिय खाती तयार होतात. ग्रामीण भागात अशा खात्यांचा शोध घेणे सोपे असले तरी महानगरात हे मोठे आव्हान ठरते, असेही आंचल गोयल यांनी सांगितले.

रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक पांचोली म्हणाले, निष्क्रिय खात्यांमधील रक्कम संबंधित व्यक्तीला सुपूर्द करणे महत्वाचे आहे. ते म्हणाले अलिकडच्या काळात सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण पाहता अशा निष्क्रिय खात्यांचा दुरुपयोग होण्याची भीती असते. त्यामुळे खातेदारांनी आपली बॅंक खाती सक्रिय ठेवण्यासाठी वेळोवेळी केवायसी, ई केवायसी करावी.

यावेळी बॅंक ऑफ बडोदाचे महाप्रबंधक सुनील शर्मा, बॅंक ऑफ इंडियाचे महाप्रबंधक सुनील शर्मा आणि रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाच्या उप महाप्रबंधक ज्योती सक्सेना यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात प्रतिनिधीक स्वरूपात निष्क्रीय खात्यांच्या दावा प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. बॅंक ऑफ बडोदा जिल्हा अग्रणी प्रबंधक उत्तम गुरव यांनी आभार मानले.

# सकाळी डब्यात भरलेले अन्न दुपारपर्यंत राहिल गरम आणि फ्रेश; या टिप्स वापरुन पाहा

शाळेत मुलांना, पती-पत्नी दोघेही ऑफिसला जाताना टिफिन घेऊन जातात. इतकंच काय तर लांबच्या प्रवासाला जातानाही प्रवासात खाण्यासाठी डब्बा भरुन नेतात. मात्र, बराचवेळी डबा असाच ठेवल्याने तो थंड होतो. त्यामुळं थंड झालेले अन्न खाणे प्रत्येकालाच आवडेल असं नाही. लहान मुलांनाही थंड अन्न फारसे आवडत नाही. त्यामुळं ते कित्येकदा डबा अर्धा परत आणतात. ज्यांना रोज गरम जेवणाची सवय असते. एकवेळ ऑफिसमध्ये ते डबा गरम करु शकतात. मात, शाळेतील मुलांकडे तो पर्याय नसतो. त्यामुळं डब्यातील अन्न दीर्घकाळ गरम राहण्यासाठी आज आम्ही तुम्हाला काही टिप्स सांगणार आहोत.

मुलांनी त्यांचा डबा रोज संपवावा म्हणून प्रत्येक आई रोज वेगवेगळ्या शक्कल लढवत असतात. कधी कधी वेगळा पदार्थ बनवून देतात कधी त्यांच्या आवडीचे पदार्थ डब्यात देतात. मात्र, मुलांनाही रोज रोज डब्यातील थंड जेवण खाणे आवडत नाही. त्यामुळं मुलांना अगदीच गरमा-गरम तर नाही पण थोडे फार गरम जेवण तर मिळू शकते. यासाठी तुम्हाला या चार टिप्स मदत करु शकतात.

**इन्सुलेटेड कंटेनरचा वापर करा**

सकाळी भरलेल्या डब्यातील जेवण दुपारपर्यत गरम ठेवण्यासाठी तुम्ही इन्सुलेटेड कंटेनरचा वापर करु शकता. यात जेवण तर गरम राहिलच पण फ्रेशदेखील राहिल. फक्त डबा पॅक करताना एक लक्षात घ्या की, ती उष्णता तुम्ही सील करुन ठेवा. त्यामुळं तुम्हाला गरमा गरम खाण्याचा आनंद मिळेल. जसा तुम्ही घरी जेवण जेवता.

**उकळते पाणी**

उकळत्या पाण्याचा वापर करुन अन्न गरम ठेवता येते. हेऐकून तुम्हालाही थोडे विचित्र वाटलं ना पण हे खरं आहे. आणि त्यासाठी तुम्हाला फार मेहनतही घ्यावी लागणार नाही. सगळ्यात पहिले एका पॅनमध्ये पाणी गरम करुन घ्या. पाणी उकळल्यानंतर ते स्टीलचा डबा ठेवून द्या आणि गॅस बंद करा. जो पर्यंत तुमचे जेवण तयार होतंय तोपर्यंत डबा उष्णता शोषून घेईल. आता जेवण पॅक करताना डब्यातील पाणी फेकून द्या आणि डबा चांगला सुकवून घ्या. डब्यात जेवण पॅक केल्याने दीर्घकाळापर्यंत गरम राहिल.

**ॲल्युमिनियम फॉइलमध्ये गुंडाळा**

हल्ली ॲल्युमियियन फॉइलचा सर्रास वापर होताना दिसतोय. जेवण दीर्घकाळापर्यंत गरम ठेवण्यासाठी थर्मल बॅरिअर म्हणून ॲल्युमिनियम फॉइलचा उपयोग करु शकता. जेवण पॅक करताना ॲल्युमिनियम फॉइल एकदम घट्ट गुंडाळा आणि आतल्या बाजुने मोडून घ्या. जेणेकरु जेवण दीर्घकाळापर्यंत गरम राहिल. मात्र, हा उपाय इन्सुलेटेड कंटेनर इतका प्रभावी नसला तरी थोड्याफार प्रमाणात जेवण गरम आणि ताजे राहिले.

## शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन स्मृतिदिन

जन्म - ७ नोव्हेंबर १८८८ (तामिळनाडू)
स्मृती - २१ नोव्हेंबर १९७० (बेंगळुरु)

नोबेल पुरस्कार प्राप्त, आघाडीचे शास्त्रज्ञ सर सी.व्ही. रामन यांचा जन्म तिरुचिरापल्ली, तामिळनाडू येथे झाला. ते भारतीय भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर वेंकट रामन होते. त्यांचे शिक्षण चेन्नई येथे झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठात १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. वयाच्या केवळ १६व्या वर्षी पदवी आणि भौतिकशास्त्राचे सुवर्णपदक मिळवणाऱ्या रामन यांनी वयाच्या १८व्या वर्षी पहिला संशोधन निबंध प्रसिद्ध केला. जून १९०७ मध्ये ते असिस्टंट अकाऊंट जनरल म्हणून कलकत्ता येथे रुजू झाले. एवढ्या उच्च पदाची सरकारी नोकरी मिळवणारे ते पहिले भारतीय होते. १९५२ मध्ये त्यांना उपराष्ट्रपती बनण्यासाठी आमंत्रण मिळाले होते, परंतु रमन यांना राजकारणात अजिबात रुची नसल्यामुळे त्यांनी नकार कळवला. प्रकाश प्रकीर्णन आणि रामन प्रभाव असे अनेक शोध लावून रामन भौतिक शास्त्रात मोठ्या स्थानी पोहचले आहेत. १९३० मध्ये त्यांना भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले होते. रविंद्रनाथ टागोरा नंतर नोबेल पुरस्कार मिळवणारे ते दुसरे भारतीय तर पहिले आशियाई ठरले. विज्ञान क्षेत्रातील अभूतपूर्व कामगिरीमुळे १९५४ मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्काराही मिळाला होता. १९५७ मध्ये लेनिन शांतता हा पुरस्कारही त्यांना देण्यात आला होता. सर सी.व्ही रामन यांच्या नावाने रँचो (रिसर्चर्स न्ड नॅचरली क्लेव्हर ह्युमन ऑर्गनायझेशन) नावाची पुण्याची संस्था २०११ सालापासून दरवर्षी डिसेंबर मध्ये 'सर सी. व्ही. रामन पुरस्कार' देत असते. त्यांच्या सन्मानार्थ भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला जातो. भारतातील वैज्ञानिक प्रगतीचे एक नवे पर्व सुरू करणाऱ्या तसेच भारताला महासत्ता बनवण्यामध्ये ही वैज्ञानिक प्रगती महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या महान शास्त्रज्ञाला विनम्र अभिवादन.

## नाट्यकर्मी मोहनदास सुखटणकर जन्मदिन

जन्म - २१ नोव्हेंबर १९३० (माशेल,गोवा)
स्मृती - ६ डिसेंबर २०२२ (मुंबई)

मोहनदास सुखटणकर यांचा जन्म गोव्यातील माशेल येथे झाला. त्यांचे वडील श्रीपाद सुखटणकर हे गोव्याचे नामांकित डॉक्टर होते. सामाजिक कार्य म्हणूनच त्यांनी वैद्यकीय सेवा केली. त्यांची आईही स्वतंत्र विचारांची होती. मोहनदास सुखटणकर यांनी गोवा हिंदू असोसिएशनच्या माध्यमातून दीर्घकाळ नाट्यसेवा केली. तसेच त्यांच्या नाट्य प्रवासात या असोसिएशन ला महत्त्वाचे स्थान आहे. या संस्थेत अगोदर त्यांनी कलाकार म्हणून प्रवेश केला आणि नंतर ते कार्यकर्ता भूमिकेत वावरले. रायगडाला जेव्हा जाग येते, लेकुरे उदंड झाली, अखेरचा सवाल, दुर्गा, स्पर्श, आभाळाचे रंग आणि मस्त्यगंधा या नाटका मध्ये त्यांनी काम केलं. नाटका प्रमाणेच त्यांनी 'कैवारी, जावई माझा भला, चांदणे शिंपीत जा, थोरली जाऊ, वाट पाहते पुनवेची, जन्मदाता, पोरका, प्रेमांकुर, निवडुंग' या मराठी चित्रपटांतही काम केले आहे. मोहनदास यांचे बालपण गोव्यात गेले. म्हापशाच्या 'सारस्वत विद्यालय' या मराठी शाळेत इयत्ता दुसरीत शिकत असताना त्यांनी पहिल्यांदाच एका छोटया नाटुकलीत काम केले. त्या नाटुकलीचे नाव होते, 'खोडकर बंडू'. अभिनय येतो म्हणून नाही, तर वर्गात सतत बडबड करतो म्हणून, आरोंदेकर मास्तरांनी त्या नाटुकलीत काम करायची त्यांना शिक्षा केली होती. त्या नाटुकल्याच्या निमित्ताने मोहनदास सुखटणकरांच्या गालाला जो पहिल्यांदा रंग लागला तो कायमचा. नाटुकलीत खोडकर बंडूची प्रमुख भूमिका करून ज्या वेळी त्यांनी बक्षीस पटकावले, त्यावेळी प्रेक्षकांनी त्यांच्या धिटाईचे कौतुक केले. या नाटुकली मुळेच सुखटणकरांना नाटकाची गोडी लागली. त्या निमित्ताने आपल्याला मुळातच अभिनयाची आवड होती याची जाणीवही त्यांना झाली. पन्नासहून अधिक वर्ष नाट्यक्षेत्राची सेवा केल्या बद्दल मुंबईच्या गोवेंकर या संस्थेकडून त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

**संकलन : मिलिंद पंडित, कल्याण**

-----------------------------------


## मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा सात जानेवारीपासून; ऑनलाईन गृहपाठ १५ डिसेंबर पर्यंत सादर करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षा येत्या दिनांक ०७ जानेवारी २०२६ पासून सुरु होत आहेत. त्यामुळे माहे जानेवारी व जुलै सत्रात प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांनी येत्या दिनानक १५ डिसेंबर २०२५ पर्यत ऑनलाईन गृहपाठ सादर करण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन / अंतर्गत मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक असलेले गृहपाठ ऑनलाईन अपलोड करणे, त्याचे मूल्यांकन विद्यार्थी ज्या अभ्यासकेंद्रावर प्रवेशित आहे, त्या अभ्यासकेंद्रावरील समंत्रक/शिक्षकांकडून ऑनलाईन पद्धतीने करण्याची कार्यप्रणाली विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार परीक्षा विभागाने विकसित केलेली आहे. मागील दोन वर्षापासून या कार्यप्रणालीचा वापर यशस्वीपणे विद्यार्थी व अभ्यासकेंद्राकडून केला जात आहे. या कार्यप्रणालीमध्ये विद्यार्थ्याने आपल्या कायम नोंदणी क्रमांकाच्या (पीआरएन) आधारे लॉगीन करून, विषयनिहाय वैयक्तिक माहिती असलेली उत्तरपुस्तिका डाऊनलोड करून या उत्तरपुस्तिकेमध्ये असलेल्या गृहपाठाचे प्रश्न आपल्या हस्ताक्षरामध्ये लिहून त्या पीडीएफ स्वरुपात पोर्टलवर विषयनिहाय अपलोड केल्यानंतर, अभ्यासकेंद्रावरील पात्र समंत्रक त्याचे ऑनलाईन मूल्यमापन करत असतात.

परीक्षा विभागाने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन गृहपाठ हे येत्या दिनांक १५ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. तसेच अभ्यासकेंद्रावरील कार्यरत समंत्रकांनी गृहपाठाची तपासणी विहित मुदतीत करावी. जेणेकरून, विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल. अन्यथा, अशा विद्यार्थ्यांना संबंधित विषयास अनुपस्थित दर्शवून निकाल जाहीर करण्यात येईल. ज्या शिक्षणक्रमांचे गृहपाठ ऑनलाईन सादर करावयाचे आहेत, त्याची यादी तसेच ऑनलाईन गृहपाठ सादर करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना, कार्यपद्धतीची पीपीटी व व्हिडीओ http://asm.ycmou.org.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी ०८०७११८८७८९, ८००७२५३०४४, ८०५५२५३०७२ या मदत क्रमांकावर किंवा oasishelpdesk22gmail.com या ईमेल आयडीवर संपर्क साधावा. तसेच मुदतीपूर्वीच ऑनलाईन गृहपाठ सादर करावेत व संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी, असे आवाहन परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

## स्वादुपिंड (pancreas)

हा पोटाच्या मागे, पोटात स्थितएक अंतर्गत अवयव आहे , जो पचन आणि संप्रेरक निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. ते साखर, चरबी आणि स्टार्च तोडणारे एंजाइम तयार करते आणि



रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करण्यासाठी इन्सुलिनसारखे संप्रेरक देखील तयार करते. स्वादुपिंड सुमारे सहा इंच लांब असतो, त्याचा आकार सपाट नाशपातीसारखा असतो आणि त्याचे डोके, मान, शरीर आणि शेपटी असे भाग असतात.

**स्थान:** हे पोटाच्या वरच्या भागात स्थित आहे, पोट, लहान आतडे, यकृत, प्लीहा आणि पित्ताशयाच्या मध्ये वसलेले आहे.

**पचनक्रियेतील कार्य:** स्वादुपिंड अन्नाचे लहान पोषक घटकांमध्ये विघटन करण्यासाठी आवश्यक असलेले एंजाइम असलेले स्वादुपिंड रस स्रावित करते जे शरीर शोषू शकते.

संप्रेरकांमधील कार्य: ते अंतःस्रावी ग्रंथी म्हणून कार्य करते, जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी इन्सुलिनचे उत्पादन यासारख्या शारीरिक कार्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी थेट रक्तप्रवाहात सोडले जाणारे हार्मोन्स तयार करते.

रचना: ते शारीरिकदृष्ट्या चार भागांमध्ये विभागलेले आहे: डोके, मान, शरीर आणि शेपूट.

## स्वर्गातील पारिजातक वृक्ष पृथ्वीवर येण्याची कथा

महाभारतातील मोतीकण : भालचंद्र ठोंबरे

पारिजातकाला स्वर्गातील वृक्ष असेही म्हटले जाते. पारिजात हा एक सुगंधी फुलाचा वृक्ष आहे. नारिंगी देठ असलेली पांढरी फुले झाडाला येतात. ही फुले रात्री उगवतात व सूर्योदयापूर्वी झाडावरून खाली पडतात, त्यामुळे सकाळी पारिजातकाच्या झाडाखाली फुलांचा सडा पडलेला आढळतो. असा समज आहे की, या झाडाखाली केलेली प्रार्थना विशेषतः आध्यात्मिक स्वरूपाची पूर्ण होते. या झाडाला शाश्वत प्रेमाचे व सुंदरतेचे प्रतीक मानले गेले आहे.

देव व दानवांच्या युद्धामध्ये देवांना अमर बनविण्यासाठी तसेच त्यांचे ऐश्वर्य परत मिळवण्यासाठी अमृत मिळवणे आवश्यक होते. यासाठी अमृत मंथन करण्यात आले. या महान कार्यासाठी देवांनी दानवांशी मित्रता करून त्यांचेही सहकार्य मिळवले व अखेर समुद्रमंथन झाले. सुरुवातीलाच जहर निघाले ते देवांच्या वाट्याला आले. महादेवाने ते प्राशन केले व कंठातच साठवून ठेवले जे सांडले ते साप विंचू अजगर अशा प्राण्यांनी चाटल्याने ते विषारी बनले. समुद्रमंथनातून पुढे अनमोल वस्तूंसोबत पारिजातक वृक्षही निघाला जो देवांच्या वाट्याला आला, देवांनी तो इंद्राच्या स्वाधीन केला इंद्राने तो आपल्या नंदनवनात लावला.



एकदा देवर्षी नारद स्वर्गातून श्रीकृष्ण भेटीसाठी मथुरेत आले असता येताना त्यांनी पारिजातकाची फुले आणली. त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळू लागला. नारदांनी ती फुले श्रीकृष्णाला अर्पण केली. श्रीकृष्णांनी ती फुले आपली पत्नी रुक्मिणीला दिली. नारदाने ही बाब श्रीकृष्णांच्या अन्य पत्नींपैकी सत्यभामेला जाऊन सांगितली व यावरून श्रीकृष्णाचे रुक्मिणीवर जास्त प्रेम असावे असे बोलून सत्यभामेतील ईर्षेला जागृत केले. सत्यभामेने कृष्णाजवळ पारिजातकाचा वृक्ष हवा म्हणून हट्ट धरला. कृष्णाने इंद्र देवाकडे या वृक्षाची मागणी केली. मात्र इंद्राने नकार दिला. हा वृक्ष देवतांसाठी असून मनुष्यांसाठी नाही. वृक्ष पृथ्वीवर नेल्यास देवता नाराज होतील, कारण स्वर्ग व पृथ्वी यामध्ये अंतर राहणार नाही. या कारणास्तव इंद्राने कृष्णाला पारिजातकचा वृक्ष देण्यास नकार दिला. तेव्हा कृष्णाने सात्यकी, दारूक, प्रद्युम्न वगैरेंसह गरुडावर स्वार होऊन स्वर्गावर स्वारी केली. कृष्णाने प्रथम नंदनवनात जाऊन माळ्यांला वृक्षाची मागणी केली. मात्र हा वृक्ष इंद्रपत्नी शशी हिने फार प्रेमाने जोपासला असून तो तिचा आवडता वृक्ष आहे. त्यामुळे हा आपणास देता येणार नाही. यासाठी इंद्रदेवही नाराज होतील व प्रसंगी युद्धासही तयार होतील असे सांगितले. हे ऐकून कृष्णाने वृक्ष उपटून गरुडावर ठेवला. सत्यभामेने माळ्यांना सांगितले शशीला सांगा आम्ही वृक्ष घेऊन जात आहोत अडवून पाहा. माळ्यांनी तो निरोप इंद्राला दिला. निरोप मिळताच इंद्र सैन्यांसह आला. इंद्र व श्रीकृष्णमध्ये घनघोर युद्ध झाले. अखेर ब्रह्मदेव व अदिती यांनी मध्यस्थी करून युद्ध थांबविले. इंद्राने कृष्णाची क्षमा मागून आपण प्रत्यक्ष परमेश्वर आहात. आपण हा वृक्ष द्वारकेला नेऊ शकता. माझे अपराध पोटात घालावे. अशी विनंती केली. कृष्णाने वृक्ष आणून सत्यभामा व रुक्मिणीच्या निवासाच्या सीमारेषेवर मध्यभागी लावला त्यामुळे वृक्ष जरी सत्यभामेच्या आवारात असला तरी फुले मात्र रुक्मिणीच्या परिसरात पडत होती. अशा प्रकारे सत्यभामेचा वृक्षासाठी केलेला हट्ट श्रीकृष्णाने पूर्ण केला. वृक्ष स्वर्गलोकांतून पृथ्वीवर आणत असताना या झाडाची काही बीज सातपुडा च्या जंगलात पडली त्यामुळे सातपुड्यातही याची काही झाडे आढळतात असा अनेकांचा समज आहे.

तसेच उत्तर प्रदेशात किंतूर येथील पारिजातक वृक्ष महाभारत कालीन असल्याचे सांगितले जाते, तर उत्तर प्रदेशातील वृंदावन या शहरात पारिजातकांची अनेक वृक्ष पाहावयास मिळतात. पारिजातक हा वृक्ष पर्यावरणाच्या दृष्टीनेही फायदेशीर आहे. हा वृक्ष वातावरणातील कार्बन डायऑक्साईड शोषून मनुष्यांच्या जीवनाला आवश्यक असणारा ऑक्सिजन सोडणाऱ्या वृक्षांपैकी एक आहे. पर्यायाने मानवी जीवनासाठी तो अत्यंत आवश्यक आहे. तसेच त्याच्या पानांचा रस औषधी गुणांनी युक्त आहे. ताप त्वचारोग यावर पारिजातकांच्या पानांच्या रसाचा उपचार प्रभावी ठरतो.

## मराठवाड्यात हुडहुडी वाढली...!

छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव या जिल्ह्यांत थंडीचे प्रमाण वाढले आहे. उत्तर भारतात बर्फवृष्टी झाल्यानंतर त्याचे परिणाम महाराष्ट्रात दिसू लागतात. त्याचप्रमाणे मराठवाड्यातदेखील चांगलीच हुडहुडी भरली आहे. बहुतांश ठिकाणी आता हवेत चांगलाच गारठा जाणवू लागला आहे.

राज्यात पावसाने विश्रांती घेतल्यानंतर थंडीचे जोरदार आगमन झाले आहे. राज्यात अनेक ठिकाणी हुडहुडी वाढली आहे. उत्तरेकडील शीत वाऱ्यांमुळे उत्तर महाराष्ट्रात थंडीची लाट कायम आहे. राज्याच्या किमान तापमानात २ ते ८ अंशांची मोठी घट झाल्याने हुडहुडी वाढली आहे. राज्यातील हवामान मुख्यतः कोरडे राहणार आहे. उत्तरेकडे थंडी कायम राहण्याची तर दक्षिणेकडे किमान तापमानात काही अंशी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मराठवाडा व विदर्भात तापमानात चांगलीच घट झाली आहे. मराठवाडा व विदर्भाची सीमा एकमेकांच्या लगत आहेत. यंदा विदर्भाच्या तुलनेत मराठवाड्यात जास्त थंडी जाणवत आहे. या पाठोपाठ पश्चिम महाराष्ट्रात थंडी सौम्य आहे. कोकणाच्या तुलनेने यंदा पश्चिम महाराष्ट्रातील थंडी कमी जाणवत आहे, असे त्या भागात राहणाऱ्या मराठवाड्यातील नागरिकांच्या प्रतिक्रिया आहेत. या आठवड्यात पुणे, मुंबई, नाशिक, सातारा या भागात किमान तापमान १२ ते १६ अंश सेल्सीएसच्या दरम्यान नोंदविण्यात आले. हवामान विभागाने देखील मराठवाड्यातील काही जिल्ह्याच्या बाबतीत अलर्ट जाहीर केला आहे. मराठवाड्यात आठ जिल्हे आहेत. त्यापैकी परभणी जिल्ह्यात नेहमीच उष्णता व थंडीचे प्रमाणही जास्त असते. राज्यात तापमानात घसरण झाल्याने महाबळेश्वरसारखी थंडी जळगावमध्ये अनुभवास येत आहे. मागच्या वर्षी हिवाळा ऋतूत सुरुवातीलाच मराठवाड्यातील परभणी येथे पारा चांगलाच घसरला होता; परंतु सध्या जळगावचे तापमान १० अंश सेल्सीएसवर आले आहे. उत्तर भारतात गारठा वाढल्याने त्याचा परिणाम मराठवाड्यात चांगलाच दिसून येत आहे. आता येत्या काही दिवसांत मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत अशाच प्रकारे थंडी वाढणार आहे. उत्तर भारतात बर्फवृष्टी होत असल्याने महाराष्ट्रातील हवामान बदलण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई तसेच कोकणात दरवर्षीपेक्षा कमी थंडी राहण्याचा अंदाज हवामान खात्यातर्फे व्यक्त करण्यात आला आहे. सातारा, महाबळेश्वर या भागात १६ अंश सेल्सीएसपेक्षा कमी तापमानाची नोंद करण्यात आली. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी या तीन जिल्ह्यांत किमान तापमानाची नोंद करण्यात आली. याबरोबरच नांदेड, हिंगोली, धाराशिव, बीड, लातूर या ठिकाणीही थंडीचा जोर वाढला आहे. मराठवाड्यात १३ अंश सेल्सीएसपर्यंत तापमानाची नोंद करण्यात आली. नाशिकचा पारा १२ अंश सेल्सीएसवर आला आहे. पुण्यात नेहमीच थंडगार वातावरण असते. त्या ठिकाणी तापमानाची नोंद १६ अंश सेल्सीएस एवढी नोंदविण्यात आली.



असाच काहीसा अनुभव मराठवाड्यात जाणवत आहे. उत्तर भारतातील हवामान जोपर्यंत स्थिर होणार नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील वातावरणात असाच गारवा राहील, असे हवामान खात्यातर्फे कळविण्यात आले आहे. मराठवाड्यातील वातावरणात बदल दिसून आल्यानंतर सर्दी, ताप, खोकला हे आजार दिसून येत आहेत. लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना सर्दी व खोकल्याचा आजार झाल्याचे दिसून येत आहे. मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात ग्रामीण भागातही थंडीचा जोर वाढल्याने शेकोट्या पेटविल्या जात आहेत. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यातील शेतात असलेले पीक काढण्यात आल्यानंतर शेतकरी थोडासा निवांत झाला आहे. यंदा मराठवाड्यात सर्वत्रच अतिवृष्टी झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या हातातील पिके वाया गेली. यंदा पावसाळा मोठा होता. त्यामुळे थंडी देखील जास्त राहील असा अंदाज मराठवाड्यातील वयोवृद्ध व जाणकार लोकांकडून काढण्यात आला होता. मराठवाड्यातील ग्रामीण भागात ऋतुचक्र बदलले असल्याने शेतात पीक घेत असताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे. मराठवाड्यात आता तर थंडीचा जोर वाढल्याने अशा रब्बीच्या वातावरणात कुठली पिके घ्यावीत, याबाबत शेतकरी देखील मार्गदर्शन घेत आहेत. उत्तर भारतातील वातावरणावर मराठवाड्यात होत असलेल्या वातावरणातील बदल लक्षात घेतला जातो. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होणार आहेत. ऐन थंडी काळात निवडणुका होणार असल्याने या वातावरणाचा प्रचार, सभा, निवडणूक, मतदान, मतमोजणी यावर नक्कीच परिणाम होणार आहे. एकीकडे वातावरणातील गारवा व दुसरीकडे राजकारणातील गर्मी असे चित्र काही दिवसांत मराठवाड्यातील ग्रामीण भागात पाहावयास मिळणार आहे.

दरम्यान हुडहुडी वाढल्याने आरोग्यविषयक प्रश्न देखील निर्माण होत आहेत. थंडीच्या काळात ज्येष्ठ नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. थंडीच्या या काळात हातमोजे, स्वेटर, मफलर, कानपट्टीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. अनेकांनी कपाटात बंद केलेले हे सर्व साहित्य बाहेर काढले आहे. यंदा थंडी दरवर्षीपेक्षा जास्तच राहणार आहे. त्यामुळे थंडीच्या लाटा लक्षात घेऊन घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले आहे. सकाळी दररोज पायपीट करणारी मंडळी देखील थंडीमुळे उशिरा घराबाहेर पडत आहेत. एकंदरित ही थंडी वाढतच जाणार असल्याने सकाळी १५ अंश सेल्सीएसपेक्षा जास्त तापमान झाल्यानंतरच घराबाहेर पडणे आरोग्याच्या दृष्टीने योग्य राहील, असा सल्ला डॉक्टर मंडळींकडून दिला जात आहे. शेवटी प्रत्येकाच्या आरोग्यावर थंडीचा वेगवेगळा परिणाम होत असतो. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला तसेच शरीराला मानवणारी थंडी याचा विचार करूनच प्रत्येकाने घराबाहेर पडावे, असेही आरोग्य विभागाच्यावतीने सांगण्यात येत आहे. दरम्यान मराठवाड्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत किमान उष्णतेचा पारा नसल्याचा फायदा प्रचारासाठी नक्कीच होणार आहे. पावसाळा व अति उष्ण उन्हाळा या दोन ऋतूत प्रचार करणे थोडेसे किचकट असते; परंतु या दोन ऋतू व्यतिरिक्त हिवाळ्यामध्ये मात्र उमेदवारांना प्रचारात तेवढी अडचण येत नाही. यामुळे यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रंगतदार तसेच उमेदवारांना विकासासाठी उष्णता देणारे ठरो, असेच यानिमित्ताने म्हणता येईल.-- **डॉ. अभयकुमार दांडगे**

## डॉक्टर टीप्स

**डाएटकट्टा । कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात । डॉ. दीक्षित**



### वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स

६. आपल्या दोघांमधील नात घट्ट करण्यासाठी एकमेकांसोबत वेळ घालवून बोलण गरजेच आहे. यामुळे तुम्ही तुमची वैवाहीक जीवन चांगले एन्जॉय करू शकता आणि तुमचा पार्टनर तुमच्या जवळ येण्यास मदत होईल. ७. चांगल्या वैवाहीक जीवनासाठी तुमचे आरोग्य चांगल असणे महत्वाचे आहे, आणि त्यासाठी चांगले भोजन, व्यायाम आणि झोप घेणे गरजेचे आहे.या काही वैवाहीक टिप्स मुळे तुम्ही तुमची लाइफ खूप चांगली प्रकारे जगू शकता तसेच तुमच्या मध्ये असलेले मतभेद सुद्धा दूर होण्यास मदत होऊल.




## विनोद

छोटी सुमन बाबांना विचारते, 'बाबा लोणचे फार महाग असते का?' बाबा म्हणतात, 'नाही, पण तू का विचारतेस?' सुमन रडत रडत म्हणते, 'सकाळी माझ्या हातून थोडसे लोणचे तुमच्या नव्या सदऱ्यावर सांडले तर आई केवढे ओरडली.'

## संदेश

Tujse dosti karne ka hisab na aya,
mere kisi bhi sawal ka jawab na aya,
hum to jagte rahe tere hi khayalo me,
aur tujhe so kar bhi hamara khawab na aya

## सुविचार

परमेश्वर तरल आहे, परंतु विद्वेषपूर्ण नाही.

**अल्बर्ट आइनस्टाइन**




### संस्कृत सुभाषित

**विद्या नसे ज्या तप दान नाही । न ज्या गुण ज्ञान न शील काही ।। न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ।।**

**अर्थ** –त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

## समाचार : शब्दकोड्यांचा



### आडवे शब्द

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '------ ज्योती'
६. निर्णय
९. समुद्रकिनारा
१२. हिंदीत पशू
१४. डुक्कर
१५. गायीचे पिल्लू
१६. मुरुमाची जमीन
१८. रमापती
२०. खराब झालेला आंबा
२१. व्यक्ती, मनुष्य
२३. अनुयायी, पायदळातील शिपाई
२५. स्वामी
२६. समुद्र
२७. जास्तीत जास्त व कमीत कमी
२९. चालविणारा अवयव
३०. दारूचा एक प्रकार
३२. मलई
३३. दिवस
३४. मध
३६. सर्वस्व
३७. गाय
३८. खाली मान घातलेला
४०. रत्न
४२. श्रीविष्णुचे बटुरूप
४६. होडी
४७. आई
४८. वरपांगी, दिखाऊ
४९. मीठाची चव
५०. तीव्र ऊन
५२. भूतकाळ
५४. वाळवंट
५५. लक्ष्मीचे एक नाव
५७. नूतन
६०. षष्ठीची देवता
६२. वृक्ष
६३. वर्ष, साल
६५. अखेर
६७. उद्यानंतरचा दिवस
६९. वचक
७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका
७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन
७४. वाईट, नासके
७६. मकर
७७. नवा जोम, चपळता
८०. हात
८१. माळेत हे ओवतात
८२. माती नसलेली जमीन

### उभे शब्द

१. अव्यस्थित राहणारा
२. अंत:करण
३. गोव्यातील शिवशंभो
४. सोन्याचा वस्त्रातील धागा
५. शहर
६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
७. तुरूंग
८. लाट, हुक्की
१०. एक शेंगभाजी
११. आवड, रूची
१२. तारूण्य
१६. ठेकेदार
१७. आईचा भाऊ
१९. नवरदेवाची आई
२२. संतोष, आनंद
२४. गुणज्ञ
२५. चित्रपटाचा हिरो
२८. शेतकरी
२९. गरीब, क्षुल्लक
३०. दात
३१. जन्म-मृत्यू
३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३५. रंगवलेले
३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय
४०. प्रजा
४१. खास, विशेष हकीगत
४२. शेतजमीन
४३. गोदाम
४४. पदार्थ शिजतानाचा आवाज
४७. पत्ता
५१. रड्या माणूस
५३. कर्ण
५६. खवा
५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप
५९. गाडीचे छत
६०. प्रश्न
६१. मुस्लिमांचा एक सण
६४. नट्टापट्टा
६६. बंगाली रुपया
६८. शुष्कता
७१. सुंदर तरुणी
७३. फणसाचा एक प्रकार
७४. गाढव
७५. बगळा
७८. रमणीय, मनोहारी
७९. पद्धत

### आडवे उत्तर

१.अमर जवान ६.निकाल ९.सागरतट १२.जानवर १४.वराह १५.वासरू १६.मुरमाड १८.रमावर २०.नासका २१.माणूस २३.पाईक २५.नाथ २६.दर्या २७.कमाल किमान २९.पाय ३०.रम ३२.साय ३३.वासर ३४.मकरंद ३६.तनमनधन ३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन ४२.वामनावतार ४६.तर ४७.माय ४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण ५२.गतकाल ५४.रण ५५.रमा ५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू ६३.सन ६५.शेवट ६७.परवा ६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता ७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी ८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

### उभे उत्तर

१.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर ५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर १०.गवार ११.रस १२.तरूणाई १६.मुकादम १७.मामा १९.वरमाय २२.समाधान २४.कदरदान २५.नायक २८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर ४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर ४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस ५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा ५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद ६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी ७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य ७९.रीत

## आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी साधला नागरिकांशी संवाद; समस्या निवारणासाठी अधिकाऱ्यांना सूचना



**लातूर/प्रतिनिधी** : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर व जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांच्या भेटी घेतल्या.

यावेळी त्यांनी विविध संस्थांचे पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांशी संवाद साधला. आमदार देशमुख यांनी आलेल्या नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार केला. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तात्काळ सूचना केल्या.

या भेटीदरम्यान माजी महापौर दीपक सूळ, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावने, सचिव अरविंद पाटील, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, रेणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सर्जे राव मोरे, गणेश एस. आर. देशमुख, अशोक अग्रवाल, व्यकंट शिंदे, पत्रकार बशीर शेख, यशपाल कांबळे, जितेंद्र स्वामी, व्यकंट जाधव, केतन हलवाई, संजय वर्मा, पत्रकार नेताजी जाधव, दिनेश व्यास, डॉ. निखिल व्यास राजकुमार कत्ते, गोविंद देशमुख, माधव सोळुंके, आनंद माने, राम साळुंखे, माधवराव मुळे, सुनंदा मोठे, हनमंत पवार, जयश्री पाटील, बिभीषण सांगवीकर, संजय शिंदे, भीमाशंकर ढेकणे, सिकंदर पटेल, अभिषेक पतंगे, दिनेश गोजमगुंडे, व्यंकटेश पुरी,बी. एस. पवार, गोपाळ शिंदे, उदय पाटील, आकाश भगत, सुभाष घोडके, प्रा.बालाजी वाघमारे, कृष्णा थोरमोठे, वेदप्रकाश मलवाडे, सुधीर पाटील, मंजीत नरहरे, दीपमाला चंदनशिवे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## त्रिभाषा धोरण निश्चिती समिती बुधवारी (दि.२६)ला विभागात येणार




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बुधवार दि.२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत आहे.यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पूर्वतयारीचा आढावा घेतला. शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) अरुण शिंदे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. विशाल तायडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. केशरचंद राठोड, पवनकुमार गोरे, देवगिरी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. समिता जाधव, डॉ. एम.एफ. मेवाड, पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे आदी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की. त्रिभाषा धोरण निश्चिती समिती दि.२५ रोजी रात्री जिल्ह्यात येणार असून बुधवार दि.२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून एमआयटी महाविद्यालयाच्या आनंद सभागृहात समिती विविध घटकांना भेटणार आहे. त्यात भाषा तज्ज्ञ, साहित्यिक, शिक्षण तज्ज्ञ, बालमानस तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण संस्था चालक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रसार माध्यम प्रतिनिधी, शिक्षक- पालक संघ आदी उपस्थित राहतील. त्यांचे म्हणणे समिती जाणून घेईल.

समितीचे स्वरुपः-अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य- डॉ. सदानंद मोर्रे, डॉ. वामन केंद्रे, डॉ. अप्रणा मॉरिस, डॉ. सोनल कुलकर्णी, डॉ. मधुश्री सावजी, डॉ. भूषण शुक्ल, सदस्य सचिव संजय यादव राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा अभियान. समिती येणाऱ्या सर्व घटकांतील तज्ज्ञांचे म्हणणे ऐकून घेईल. तसेच संवाद साधेल,असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यातील लोक सहभागी होऊन आपले म्हणणे सादर करतील.

बाहेरील जिल्ह्यातील लोकांना म्हणणे सादर करण्या करीता ज्यांना येथे येणे शक्य नाही त्यांच्यासाठी त्या त्या जिल्ह्यातून दूरदृष्य प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

## भाजपाच्या प्रचार शुभारंभ पदयात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद

# रेणापूरात विकास कामाच्या आधारावर विजय निश्चित: भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड

**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर नगरपंचायत निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांचा प्रचार शुभारंभ भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार रोजी सकाळी ग्रामदैवत आदिशक्ती श्री रेणुका मातेची महापूजा व आरती करून अनेक मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून प्रचाराचा प्रारंभ करण्यात आला. प्रचार शुभारंभाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या भाजपाच्या या पदयात्रेला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. रॅलीच्या मार्गावरील विविध मंदिरासह महेबूब सुभानी दर्गा येथे श्रीफळ फोडण्यात आले. जागोजागी उमेदवारांचे मतदारांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. एकूणच भाजपाच्या प्रचार शुभारंभ रॅलीने रेणापूर शहरातील वातावरण ढवळून निघाले आहे.

रेणापूर नगरपंचायतीसाठी येत्या ०२ डिसेंबर रोजी मतदान होणार असून या निवडणुकीत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे निवडणूक रिंगणात उतरलेल्या भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार श्रीमती शोभा शामराव अकनगिरे सर्व सतरा उमेदवार यांच्या प्रचाराचा शुभारंभ मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. प्रचार शुभारंभाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या पदयात्रेस प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला यात महिलांची संख्या लक्षणीय दिसून येत होती. ढोल ताशाच्या गजरात फटाक्याच्या आतिषबाजीने निघालेल्या या पदयात्रेतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा आकनगिरे आणि इतर उमेदवारांचे ठिकठिकाणी मतदारांच्या वतीने स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी महिला भगिनींनी औक्षण करून विजयीभव अशा शुभेच्छा दिल्या.



आदिशक्ती श्री रेणुका माता मंदिरातून निघालेली भाजपाची ही पदयात्रा रेणापूर शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. मिरवणूक मार्गावर असलेल्या श्री खंडोबा मंदिर, हनुमान मंदिर, यलम गल्ली, बालाजी मंदिर, हनुमान मंदिर, बौद्ध नगर, खंडोबा मंदिर, एकुरके गल्ली, महेबूब सुभानी मेन रोड या देवदेवतांचे मनोभावे दर्शन घेऊन श्रीफळ फोडण्यात आले. या पदयात्रेत युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या समवेत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा शामराव अकनगिरे, पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे नवनाथ भोसले, महिंद्र गोडभरले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, शरद देरेकर, प्रताप पाटील, उद्धव काळे, सुरज शिंदे, पद्माकर चिंचोलकर, विजय काळे, वसंत करमूडे, श्रीकृष्ण पवार, सुकेश भंडारे यांच्यासह भाजपाचे प्रभागातील उमेदवार सुमन मोटेगावकर, सुनिता बस्तापुरे, धम्मानंद घोडके, दत्ता सरवदे, धरती गाडे, अच्युत कातळे, पल्लवी शिंदे, शेख राबियाबी, शेख हुसेना, आत्तार खैरूनिसा, निलेश उरगुंडे, उत्तम चव्हाण, ज्योती चव्हाण, चतुरा लोकरे, अंजना चव्हाण, प्रदीप राठोड यांच्यासह प्रत्येक प्रभागातील भाजपाचे निरीक्षक, पदाधिकारी, रेणापूर शहरातील कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भाजपाच्या निघालेल्या प्रचार शुभारंभ रॅलीने संपूर्ण रेणापूर शहर ढवळून निघाले आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या विविध विकास कामाच्या आधारावर रेणापुरातील मतदार बंधू भगिनी निश्चितपणे भाजपाला आशिर्वाद दिल्याशिवाय राहणार नाहीत असे सांगून प्रचार शुभारंभ रॅलीच्या समारोप प्रसंगी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, विजय आपला निश्चित असला तरी प्रत्येक कार्यकर्त्यांनी भाजपाचा प्रचंड मताधिक्याने विजय व्हावा यासाठी जिद्दीने मेहनत घ्यावी असे आवाहन केले. अभिषेक आकनगिरे यांनी पाच वर्षाच्या कार्यकाळात नगरपंचायतीच्या माध्यमातून केलेल्या विविध विकास कामाची माहिती सांगून येत्या काळात करावयाच्या कामाचा संकल्प बोलून दाखविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दत्ता सरवदे यांनी उपस्थित यांचे आभार मानले.

## नवतंत्रज्ञान आत्मसात करणारा विद्यार्थी स्वयंभू बनतो - प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे

**बाभळगाव/प्रतिनिधी** : आजच्या डिजिटल युगात संगणक हे एक आवश्यक साधन बनले आहे. संगणकामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात ज्ञान मिळवणे सोपे झाले आहे. शिक्षण, संशोधन, संवाद आणि रोजगार यामध्ये संगणकाचा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. संगणकाच्या मदतीने विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण घेऊ शकतात, विविध प्रोजेक्ट्स तयार करू शकतात आणि नवीन कौशल्ये आत्मसात करू शकतात. संगणकामुळे शिक्षण प्रक्रिया अधिक प्रभावी आणि रोचक बनली आहे. संगणकाच्या माध्यमातून नवतंत्रज्ञान आत्मसात करणारा विद्यार्थी स्वयंभू बनतो असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले.



एनआयआयटी, नवी दिल्ली आणि दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगावच्या कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव व डीएसपीएस नर्सिंग महाविद्यालय, बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक महिना महाविद्यालयात आयोजित केल्या गेलेल्या मोफत संगणक प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र वितरण प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे बोलत होते. अध्यक्षस्थानी एनआयआयटी, नवी दिल्लीचे नॅशनल प्रमुख दिनेश मेहता हे होते. यावेळी विचारपीठावर प्राचार्य मुशिरा पठाण, प्रथम आधार फाउंडेशन, लातूरचे विवेक नरहारे आणि जयश्री देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना कटारे म्हणाले, विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण, डिजिटल संसाधने आणि विविध प्रकारचे शैक्षणिक साधनांचा लाभ घेता येतो. नवतंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांची तर्कशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सर्जनशीलता वाढते. याशिवाय, नवतंत्रज्ञानामुळे शिक्षकांना देखील नवीन पद्धतीने शिकवण्याची संधी मिळते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन अलीम शेख यांनी केले. कार्यक्रमासाठी बाभळगाव आणि परिसरातील बचत गटातील प्रशिक्षित महिला आणि विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कोलकाता हादरलं! बांगलादेशात ढाकाजवळ ५.५ रिश्टर तिव्रतेचा भूकंप; ईशान्य भारतातही जाणवले धक्के

**मुंबई/प्रतिनिधी** : बांगलादेशची राजधानी ढाकाजवळ शुक्रवारी ५.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला, या भूकंपाचे धक्के थेट भारतातील कोलकाता आणि ईशान्य भारतातील अनेक भागांत जाणवले, या भूकंपाबद्दल युएस जिओलॉजिकल सर्व्हे (ळएउए)ने माहिती दिली आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदु हा ढाका शहरापासून ५० किमी अंतरावर नरसिंगडी येथे होता. तर या भूकंपाची खोली १० किमी इतकी होती, असे यूएसजीएसने सांगितले आहे. दरम्यान या भूकंपात अद्याप कोणतेही मालमत्तेचे किंवा जीवितहानी झाल्याची माहिती मिळालेली नाही. कोलकाता येथे अनेक लोकांना सकाळी १०.१० च्या सुमारास काही सेकंदांसाठी धक्के जाणवले, ज्यामुळे लोक घाबरून घरे आणि इमारतींम धून बाहेर पडले. अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांनी देखील या भूकंपाच्या वेळी इमारती हालत असल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत.

## डोंगराळेतील ३ वर्षांच्या मुलीवर अमानुष अत्त्याचार व हत्त्या सुवर्णकार समाजात संतापाची लाट; दोषींना तात्काळ फाशीची मागणी

**लातूर/प्रतिनिधी** मालेगाव तालुका (जि. नाशिक) येथील मौजे डोंगराळे गावात सुवर्णकार समाजातील केवळ तीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या क्रूर अत्याचारानंतर निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. या भीषण घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली असून दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशन, लातूर यांच्यावतीने जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

संघटनेने आपल्या निवेदनात म्हणटले आहे कीं निष्पाप बालिकेला न्याय मिळावा आणि दोषींना फाशीची शिक्षा व्हावी, हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे नमूद केले. या निवेदनात सदर गुन्हा फास्टट्रॅक न्यायालयात वर्ग करून खटला तातडीने चालवावा. दोषींना फाशीची शिक्षा होण्यासाठी आवश्यक पाठपुरावा संबंधित प्राधिकरणांकडे तातडीने करावा. अशा घृणास्पद घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या. अशा मागण्या करण्यात आल्या असून सदर निवेदन लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशनचे अध्यक्ष राजाभाऊ हरिभाऊ बोकन यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे, तालुका अध्यक्ष राहुल भुतडा, समाजाचे गजेंद्र बोकन, शिवसेनेचे आकाश बजाज, गणेश बेद्रे, पुष्कर उपाध्याय आदी



मान्यवर उपस्थित होते. निवेदनाद्वारे समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन या गंभीर प्रकरणात न्याय मिळावा आणि गुन्हेगारांना आदर्श शिक्षा व्हावी, अशी ठाम भूमिका सोनार समाजाने घेतली आहे.

सदरील घटनेची अनेक ठिकाणी निषेध नोंदविला जात आहे.

## जिल्हा युवा महोत्सवात आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे उत्कृष्ट यश

**धाराशिव/प्रतिनिधी** : धाराशिव जिल्हा क्रीडा विभाग आयोजित जिल्हा युवा महोत्सवात आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, धाराशिव येथील विद्यार्थ्यांनी अतिशय उल्लेखनीय कामगिरी करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.




कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला समूह लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटवून विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने, नृत्यसौंदर्य, तालबद्धता आणि कलात्मक सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली आणि समूह लोकगीत स्पर्धेत समूहातर्फे सादर केलेल्या सुरेल आणि संयत गायनाने स्पर्धेत त्यांना दुसरे स्थान मिळवून दिले. या दोन्ही संघांनी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि उत्तम समन्वयाच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.


प्राचार्य डॉ अमोल जोशी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे मनः पूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या कष्ट, प्रतिभा व समर्पणाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सांस्कृतिक जाणीव आणि संघभावना विकसित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# प्रा.डॉ. मारुती अभिमान लोंढे यांचा सत्कार



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.मारुती अभिमान लोंढे यांचा ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा . प्रमोद शहा आणि सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा.डॉ. राजेंद्र दास यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. मारुती अभिमान लोंढे यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केलेली आहे.त्यांनी अनेक ग्रंथाचे लेखन केलेले आहे व त्यांना सेंट्रल यूनिव्हर्सिटी ऑफ अमेरिका या विद्यापीठाची डि.लीट पदवी प्राप्त झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये स्पर्धा परीक्षा आणि नेट सेट संदर्भामध्ये ते व्याख्यान देत आहेत. या त्यांच्या यशामुळे अर्थतज्ञ प्रा .प्रमोद व साहित्यिक डॉ. दास यांनी त्यांचा सत्कार केला व असाच यशाचा आलेख उंचावत रहावा अशा प्रकारच्या शुभेच्छा दिल्या. सत्कार बद्दल प्राध्यापक डॉ. मारुती अभिमान लोंढे यांनी सर्वांचे आभार मानले.

याप्रसंगी प्रा.डॉ.सतीश घाडगे, प्रा.शुभम चवरे उपस्थित होते.

# मुरूममध्ये सुरळीत पाणीपुरवठ्याचा प्रश्न, रस्त्यांवरील अतिक्रमणाचा मुद्दा गाजणार

मुरूम(प्रतिनिधी)- मुरूम नगर परिषद निवडणुकीत दिवसेंदिवस रंगत वाढत आहे. शहरातील मुख्य रस्ता, दुभाजक याबरोबरच जुन्या गावासह नवीन हद्दवाढ भागातील अंतर्गत रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागला आहे. मात्र जुन्या शहरातील काही भागासह नवीन हद्दवाढ भागात सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.मुख्य रस्ते मोठे असूनही अतिक्रमणामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतुकीची कोंडी होऊन किरकोळ अपघात होत आहेत. वाहतूक कोंडीमुळे वृद्ध नागरिकांसह शाळकरी विध्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे पाणी प्रश्नासह,अतिक्रमण,व ाहतूक कोंडी, महिलांसाठीच्या सुविधा आदी मुद्दे पालिका निवडणुकीत ऐरणीवर येणार आहेत.

मुरूम शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी तसेच या भागातील शेती सिंचनाखाली आणून शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी शहरालगत वाहणाऱ्या बेणीतुरा नदीवर प्रकल्प बांधण्यात आले आहे. यामुळे पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असला तरी जुन्या शहरातील कांही भागात तसेच हद्दवाढ भागात सुरळीत पाणी पुरवठा होत नसल्याने धरण उशाला,आणि कोरड घशाला अशी अवस्था या भागातील नागरिकांची झाली आहे.वाहनांची वाढती संख्या पाहता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असून किरकोळ अपघात होत आहेत. या ठिकाणाहून परगावी जाण्यासाठी नागरिकांना तसेच शाळा,महाविद्यालयात जाण्यासाठी शाळकरी विध्यार्थ्यांना या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.मुरूम शहरातील बाजारपेठ मोठी

छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडी शहरात दर्जेदार रस्ते,गटारी बांधण्यात आले आहेत.मात्र रस्ते मोठे होऊनही फेरीवाले रस्त्यावर बेशिस्त व्यवसाय करत असल्याने चौका चौकात वाहतुकीची कोंडी होत आहे. आठवडी बाजाराला येणारे व्यवसायिक मुख्य रस्त्यावर दुकाने थाटत आहेत.याठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे.

# एक तेरा सात ग्रुपच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद



धाराशिव (प्रतिनिधी) - एक तेरा सात ग्रुप सातत्याने सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. या ग्रुपचे अध्यक्ष अहमद हनीफ कुरेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास दि.२० नोव्हेंबर रोजी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

धाराशिव शहरातील एक तेरा सात ग्रुप रक्तदान शिबिर गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने आयोजित करत आहे. तर फकीरा नगर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन ग्रुपचे अध्यक्ष कुरेशी यांनी केले. रक्त संकलनसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालयातील रक्त संकलन अधिकारी व स्टाफ यांनी काम पाहिले. यावेळी मकबुल टकारी, अशोक नागटिळे, अहेमद कुरेशी, फिदोज काझी, अल्ताफ शेख, चाँद सय्यद, अमजद कुरेशी, रुधीर गायकवाड, शारीक शेख, शकील काझी, अमजद शेख, कुणाल पेठे, झहीर कुरेशी, शाहीर नदाफ, जुबेर शेख, अजय कांबळे, मुजकीर कुरेशी, नवनाथ डोंगरे, सिताराम शिंदे, बिलाल कुरेशी, अकेब कुरेशी, जमीर शेख, मुजाहीर कुरेशी, तय्यब शेख, अरेफ सौदागर, सबील कुरेशी, निजाम कुरेशी, फारोक शेख, आयाज कुरेशी, अशपाक शेख आदींसह ग्रुपचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते आणि रक्तदाते प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तृतीयपंथी स्मृती दिनानिमित्त धाराशिव येथे तृतीयपंथीय सन्मान व जनजागृती कार्यक्रम

धाराशिव (जिमाका) २० नोव्हेंबर हा तृतीयपंथीं स्मृती दिवस जगभरात तृतीयपंथीय व्यक्तींवरील हिंसाचाराविरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी तसेच हिंसेत मृत झालेल्या तृतीयपंथीय व्यक्तींना आदरांजली अर्पण करण्यासाठी पाळला जातो.

त्यानुसार,२० नोव्हेंबर २०२५ रोजी सामाजिक न्याय विभागामार्फत धाराशिव येथे तृतीयपंथीं स्मृती दिनानिमित्त जिल्हास्तरावर एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी हिंसेत मृत झालेल्या तृतीयपंथीय व्यक्तींना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमात तृतीयपंथीयांना समाजामध्ये काम करताना भेडसावणाऱ्या अडचणी,हिंसामुक्त समाजाचे महत्त्व,लिंग-संवेदनशीलता, तृतीयपंथीयांचे अधिकार आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांद्वारे उपलब्ध सहाय्य व संरक्षण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी तृतीयपंथीय व्यक्ती,विद्यार्थी,सामाजिक कार्यकर्ते तसेच सचिन कवले,सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण,धाराशिव यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमातून समाजाला तृतीयपंथीयांना सन्मान,समानता आणि सुरक्षिततेची भावना देण्याचा संदेश देण्यात आला.

# महापूर समस्येवरील उपाय ही शासन, प्रशासन आणि समाजाची सामूहिक जबाबदारी



धाराशिव (प्रतिनिधी)- मराठवाड्यासह महाराष्ट्रात इतरत्रही यावर्षी झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळे आलेल्या महापुरामुळे शेतीची अपरिमित हानी झालेली आहे. गावसमाज विस्कळीत झाला आहे. जनजीवन पूर्ववत होण्यासाठी समाज आणि शासनाचे संवेदनशील आणि नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक आहेत. ही केवळ नैसर्गिक आपत्ती नव्हती तर संरचनात्मक आणि नियोजनात्मक गंभीर चुका, त्रुटी आणि बेजबाबदारपणा यांचा हा एकत्रित परिणाम होता. अशा तऱ्हेच्या संकटांची वारंवारिता पाहता त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरजच नव्हे तर तातडी आहे. त्यासाठी शाश्वत विकासाची दृष्टी व दिशा आवश्यक आहे. या सर्व स्थितीवर उपायांसाठी शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्रित येत सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचा सुर 'महापूर : कारणे आणि उपाय - अभ्यास' या विषयावरील चर्चासत्रात मान्यवरांनी काढला.

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन,कल्चर अँड मिडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'महापूर : कारणे आणि उपाय - अभ्यास' अहवालाचे प्रकाशन व चर्चा सत्राचे गुरुवार २० नोव्हेंबर रोजी विनोबा भावे सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर प्रा.प्रदीप पुरंदरे, सोमीनाथ घोळवे, सुनीती सु.र, डॉ.संजय मंगला गोपाळ, डॉ.रेखा शेळके आदि मान्यवर सहभागी झाले होते.

यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, ज्येष्ठ गांधीवादी श्रीराम जाधव, अर्थतज्ञ प्रा.एच. एम. देसरडा व सर्व संबंधित मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक इब्राहिम खान यांनी केले. या चर्चासत्रात केवल फडतरे, झुल्पिकार काझी, वैभवी प्रेमलता संजय व सर्व संबंधितांनी हा अहवालाच्या संदर्भाने आपले अनुभव मांडले.

सामजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर पुढे बोलताना म्हणाल्या की या अहवालात गेली २ महिन्यात आम्ही सर्व सहकाऱ्यांनी पूरग्रस्त भागात जाऊन शेतकरी आणि सर्व बाधित भागाला भेट देऊन सत्य स्थिती मांडण्यात आली आहे. आज जल, जंगल आणि जमिनीसाठी लढणाऱ्या लोकांवर हल्ले होत आहेत. ग्रामीण भागातील संस्थांना उभे करण्याचे काम करणे आवश्यक आहे. बाधित व्यक्तींना तत्काळ मदत करण्याची गरज आहे.

सामाजिक कार्यकर्त्या सुनीती सु. र. मार्गदर्शन करताना म्हणाल्या की हवामान बदल हे एक वास्तव आहे. त्याला कसे सामोरे जायचे आहे? हा विचार करणे आवश्यक आहे. आत्ताच्या स्थितीचा वैज्ञानिक अभ्यास करून नियोजन करणे आवश्यक आहे. नद्यांमध्ये अतिक्रमण झालेले असून नद्यांचे ओढे आणि नाले झालेत. हे थांबणे आवश्यक आहे. झालेले नुकसान झालेले पाहता शेतकरी पुढील पेरणी करू शकणार नाहीत. ही पाहणी, हा अभ्यास, या शिफारशी आणि या परिस्थितीवर मार्ग काढण्यासाठी आता तत्काळ कामाला लागले पाहिजे. समाजाने आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक दिनचर्येचा विचार करणे आवश्यक आहे.

पाणी अभ्यासक प्रा.प्रदीप पुरंदरे मार्गदर्शन म्हणले की, एकच गोष्ट कितीवेळा सांगायची असे सध्या वाटत आहे. मोठ्या प्रमाणात नदी भागात अतिक्रमण होत आहे. अतिक्रमण हटवण्यासाठी कोण जबाबदार आहे? नदीची अधिसूचना काढणे आवश्यक आहे. कालवा अधिकारी यांची नेमणूक होत नाही. जलसंधारणाच्या संदर्भात कायदे आहेत मात्र, त्यातील काही कायद्यांसाठी नियम नाहीत. संविधानिक प्रक्रियेनुसार पाणी हा राज्याचा विषय आहे.

सिंचनासाठी ९ कायदे बनवले आहेत मात्र, त्यातील ८ कायद्यांचे नियम केले गेले नाहीत. प्रत्येक नदीची अधिसूचना काढणे अत्यंत गरजेचे आहे. शासन विचार क्षमता गमावून बसले असून त्यांच्या हातून परिस्थिती निघून जात आहे. जलयुक्त शिवार याची गरज नव्हती. १३ योजनांची एकत्रितता करून जलयुक्त शिवार ही योजना राबविण्यात आली. नदीवरती हजारो बंधारे बांधले, याची कोणीही परवानगी घेतली नाही. जलयुक्त शिवारचा चुकीचा परिणाम झालेला आहे.

**सोशल ऑडिट होणे गरजेचे - सोमीनाथ घोळवे**

पर्यावरण अभ्यासक सोमीनाथ घोळवे म्हणाले की, समस्यांच्या उपायांसाठी धोरणाचे सोशल ऑडिट होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात ८५% अल्पभूधारक आहेत. कोणतेही गाव आपण उदा. घेतले की, काही बाबी लक्षात येते. आपल्याकडे यंत्रणा नावाची गोष्ट नाही. ३० वर्षापूर्वी जितक्या विहिरी होत्या त्यापेक्षा कितीतरी अधिकारी विहिरी आता झाल्या आहेत. बांध राहिले नाहीत, सगळ्या जमिनी सपाट झाल्या आहेत.

**निसर्गसंवादी विकास नियोजनाची पाऊलवाट हवी - डॉ.संजय गोपाळ**

सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय मंगला गोपाळ मार्गदर्शन करताना म्हणाले की या अहवालात भूमिका, पार्श्वभूमी, काय घडले? - उद्ध्वस्त जीवनाची हकीकत, का घडले ? - पूरसंकटाची कारणमीमांसा, पुनर्वसनाच्या वाटेवरील काटे, 'तात्कालिक मदत' व त्यापलीकडे पुनर्वसन : काय असावे धोरण आणि प्रक्रिया, जल व्यवस्थापन : शासनाची जबाबदारी, जागतिक हवामान बदल आणि पूर संकट, समारोप : निसर्गसंवादी विकास नियोजनाची पाऊलवाट हवी आदि प्रकरणे असून याबद्दल अभ्यासाअंती सर्व सत्य परिस्थिती मांडलेली आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

# केंद्रात सोयाबीन घालण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड अतिवृष्टीनंतर आताशेतकऱ्यांना थंडीचा मार

वाशी(प्रतिनिधी)-शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा म्हणून सरकारकडून सुरू करण्यात आलेल्या अंगठ्याच्या अटीमुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तालुक्यात शेतकऱ्यांचे सोयाबीन, उडीद, मूग याची योग्य भावात खरेदी व्हावं म्हणून चार आजघडीला आधारभूत केंद्रांना मंजुरी देण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांना आपले धान्य या केंद्रांवर विक्री करण्यातही आधी नोंदणी करणे गरजेचे आहे. ज्यासाठी मागील वर्षी आधार संलग्न असलेल्या मोबाइल क्रमांकावर ओटीपी पाठवण्यात येऊन नोंदणी पूर्ण करण्यात येत होती. झालेल्या नोंदणीनुसार केंद्रावरील गर्दी टाळण्यासाठी शेतकऱ्यांना फोन करण्यात येऊन आपला माल आणण्यास सांगण्यात येत होते.

यावर्षी मात्र यात अधिक पारदर्शकता यावी म्हणून सरकारने शेतकऱ्याला नोंदणीवेळी अंगठा लाऊन नोंदणी करण्याची जाचक अट टाकल्याने मोठी अडचण झाली आहे. मागील वर्षी केंद्र चालकांकडे कागदपत्र आणि मोबाइल क्रमांक दिल्यास तांत्रिक अडचण असली तरी संकेतस्थळ चालू होताच केंद्रचालक ओटीपी पाठवत व तो शेतकऱ्यांनी सांगताच नोंदणी होत होती. यावेळी ही संकेस्थळाची तांत्रिक अडचण सातत्याने होत आहे. ज्यामुळे शहरासह तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नोंदणी करण्यास वेळ जात आहे.

संकेतस्थळ रात्रीच चालत असल्याने तारांबळ संकेतस्थळ रात्रीच्यावेळी अधिक चांगल्या प्रकारे चालत असल्याने शेतकऱ्याला नोंदणीसाठी रात्री केंद्रावर थांबावे लागत आहे. सध्या अत्यंत कडाक्याची थंडीची लाट असल्याने अनेक वृद्ध शेतकरी थंडीत कुकुडत केंद्रावर थांबत आहेत. त्यातच शेतातील कष्टामुळे हातांच्या रेषा गायब झाल्याने अंगठा लाऊन नोंदणी करण्यास मोठी अडचण झाली आहे. याकडे सरकारने गांभीर्याने बघणे गरजेचे असून आधार संलग्न मोबाईल द्वारे नोंदणीची मागणी होत आहे.

# विद्यार्थ्यांना कार्यशाळेत दिले वॉटरप्रूफिंगचे धडे तुळजाभवानी अभियांत्रिकमध्ये झाली कार्यशाळा

तुळजापूर(प्रतिनिधी)-वॉटरप्रूफिंग करण्याच्या पद्धती आणि त्यासाठी वापरली जाणारी केमिकल्स यांची इत्यंभूत माहिती व्हावी, यासाठी तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित एकदिवसीय वॉटरप्रूफिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वॉटरप्रूफिंगच्या तंत्राबद्दल तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागामार्फत 'वॉटरप्रूफिंग करण्याच्या पद्धती व विविध केमिकल्स' या विषयावर एकदिवसीय तांत्रिक कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अमित गोडीकर, स्वप्निल बाबरे आदींनी विद्यार्थ्यांना वॉटरप्रूफिंगच्या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत सविस्तर माहिती दिली. विविध केमिकल्सचे प्रकार, त्यांचे कार्य, प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आणि सिद्धांतात्मक स्पष्टीकरण आदी विविध पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. सर्व विद्यार्थी व उपस्थितांना प्रशिक्षण प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आले. शेवटी विभागप्रमुख प्रा. एस. डी. सगरे यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी प्रा. एस. एस. शिंदे आणि प्रा. आर. एम. कुरे आदींनी परिश्रम घेतले.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649